श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

जानेवारी २०२४ | वर्ष – १२, अंक – १ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने १२

## एसव्हीजेसीटी शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन व गुणगौरव कार्यक्रम उत्साहात संपन्न




*सभामंचावर डावीकडून – जान्हवी चाळके, शरयू यशवंतराव, डॉ. आनंद लेले, कल्पेश जुवेकर, प्रज्ञा पारकर, पल्लवी तेंडुलकर*

डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ नुकताच उत्साहात संपन्न झाला. या वेळी डॉ. आनंद लेले, प्राध्यापक, गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स व अध्यक्ष, आजीव सदस्य मंडळ, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांनी 'पंचतुंड नररुंड मालधर' हे ईशस्तवन सादर केले. या समयी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका जान्हवी चाळके यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. शाळेच्या संचालिका शरयू यशवंतराव यांनी पाहुण्यांचा सत्कार केला व शाळेच्या वर्षभरातील प्रगतीचा आढावा घेतला. प्रमुख पाहुणे डॉ. आनंद लेले यांच्या हस्ते शालेय, सहशालेय व क्रीडा स्पर्धांमध्ये नैपुण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना डॉ. लेले म्हणाले की, लहान वयातच प्रशस्तिपत्र मिळाल्याबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मी अभिनंदन करतो. या संस्थेच्या परिसरात येणाऱ्या मंडळींना जी सकारात्मक ऊर्जा जाणवते त्याची प्रत्यक्षात अनुभूती मला आली. शिक्षक असल्यामुळे मी अनेक शाळांमध्ये गेलो आहे पण येथील जे प्रेरणादायी वातावरण, प्रसन्नता अनुभवता आली ती दीर्घकाळ स्मरणात राहील. येथील विद्यार्थी आणि पालकांना मी भाग्यवान समजतो कारण रोज काही–ना–काही निमित्ताने त्यांना येथे सहभागी होता येते आणि त्यातून एक सज्जड असे व्यक्तिमत्त्व जे कुटुंबाला, समाजाला, देशाला आणि संपूर्ण मानवजातीला उपयोगी पडेल असे घडवण्याची प्रेरणा आपल्याला मिळत आहे.




*डॉ. आनंद लेले यांच्या हस्ते पारितोषिक वितरण*



*सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पारितोषिकाची मानकरी अनुष्का सकपाळ*

विद्यार्थ्यांनी जे यश संपादन केले आहे त्यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली आहे, संपूर्ण जगात काहीच मोफत मिळत नाही. आपल्याला सातत्याने प्रगती करायची असेल, स्वावलंबी व्हायचे असेल, व्यक्तिमत्त्व तेजस्वी करायचे असेल, तर अभ्यासाची SQ3R पद्धत लक्षात घ्यावी लागेल. S म्हणजे Survey – याचा अर्थ कुतूहलातून माहिती संपादन करणे, Q म्हणजे Question – प्रश्न विचारून ज्ञान ग्रहण करणे, 3R म्हणजे Read, Recite आणि Review – वाचन, स्मरण आणि सिंहावलोकन या पंचसूत्रीचा अवलंब करून आपण अभ्यास करावा.

आपल्या शाळेची उपक्रमशीलता बघितल्यावर केवळ आनंदच झाला नाही, तर मी जिथे काम करतो तेथील शाळांत हे उपक्रम घेऊन जावेत असं वाटलं कारण ही शाळा उपक्रमांद्वारे तुमच्या मनामध्ये प्रश्न निर्माण करते आणि विद्यार्थी ज्ञान मिळवण्यासाठी उद्युक्त होतात. व्यक्तिमत्त्वाचे बहिरंग घडवत असताना अंतरंगाच्या विकासाकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. सामूहिक काम करता येणे, हा व्यक्तिमत्त्व विकासाचा एक पैलू आहे आणि त्याचे धडे या शाळेत दिले जातात असे मला वाटते.

व्यक्तिमत्त्व विकासाचे चार टप्पे म्हणजे व्यष्टी, समष्टी, सृष्टी आणि परमेष्टी. व्यक्तीचा स्वतःचा विकास म्हणजे व्यष्टी, त्याच्या कुटुंबाचा–समाजाचा–देशाचा विकास म्हणजे समष्टी, केवळ मानवजातीचाच नव्हे तर झाडे, पशु–पक्षी, संपूर्ण पर्यावरणाचा विकास म्हणजे सृष्टी आणि व्यक्तीची स्वतःची आध्यात्मिक प्रगती म्हणजे परमेष्टी. या क्रमाने आपली वाटचाल होण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.

हे सर्व करताना आपली धावपळ होते, परिश्रम घ्यावे लागतात, आपण गतिमान होतो. गतिशीलता ते गतिशून्यता हा मानवी मनाचा प्रवासदेखील व्यक्तिमत्त्व विकासाचा एक महत्त्वाचा पैलू असतो. गतिशून्यतादेखील आपण अनुभवली पाहिजे. मन शांत करण्यासाठी दिवसातून काही वेळ शांत बसले पाहिजे, आत्मचिंतन केले पाहिजे. ही गतिशून्यता जर आपण प्राप्त केली तर अधिक गतिशील होण्यास आपणाला मदत होते. हा व्यक्तिमत्त्व विकासाचा एक प्रमुख टप्पा असल्याचे मला वाटते. या प्रकारे जर विद्यार्थी वर्गाने काम केलं तर येत्या पाच–दहा वर्षात माझ्यासमोर बसलेले हे विद्यार्थी कृतज्ञतापूर्वक या शाळेला भेट द्यायला येतील व या समूहकार्यात सहभागी होतील असा मला विश्वास वाटतो.

यानंतर विद्यार्थ्यांनी विविध भारतीय परंपरा, संस्कृती आणि लोककला यांचे दर्शन घडविणारा बहारदार कार्यक्रम सादर केला. आद्यपूजेचा मान लाभलेल्या गणरायाच्या 'देवा श्रीगणेशा' या गीतावरील नृत्याने इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनाची दिमाखदार सुरुवात केली. यानंतर नर्सरी, ज्युनिअर आणि सिनिअर के.जी.च्या विद्यार्थ्यांनी 'One Little Finger', 'Butterfly O' Butterfly' , 'ए भालू , चल चंद्रावर जाऊ' यासारख्या बालगीतांनी प्रेक्षकांच्या बालपणीच्या स्मृती जागृत केल्या. पहिलीच्या विद्यार्थ्यांनी 'पाणी वाचवा, झाडे लावा' हा संदेश आपल्या सादरीकरणातून दिला. त्याचबरोबर इयत्ता तिसरीच्या व आठवीच्या विद्यार्थ्यांनी 'लेहरा दो' व 'वंदे भारती' या देशभक्तिपर गीतांवरील नृत्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या बुद्धियुक्तीचा पोवाडा सादर केला. आबाल वृद्धांनाही ज्याचा मोह आवरता आला नाही अशा बाळकृष्णाच्या निरागस लीलांचे दर्शन इयत्ता सातवीच्या मुलींनी 'गोविंद बोलो हरी गोपाल बोलो' या गीतातून सादर केले. 'चांद्रयान ३'च्या यशस्वी उड्डाणामुळे देशाच्या इतिहासात मानाचा तुरा रोवणाऱ्या 'इस्रो' संस्थेचा गौरव




*धिटाईने सादरीकरण करणारी इयत्ता नर्सरीची मुले*




*भारत रत्नांचे गौरवगान - इयत्ता तिसरी*

करणाऱ्या 'जय हो इस्रो' या गीतावर नृत्य सादर करत चांद्रयान ३च्या उड्डाणाचा देखावा इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी सादर करून उपस्थितांना संपूर्ण प्रक्रियेची पुनरानुभूती दिली. शेतीत वर्षभर घाम गाळून धान्याची निर्मिती करणाऱ्या देशाचा कणा असणाऱ्या शेतकऱ्यांच्या वर्षभरातील विविध कामांचे वर्णन करणाऱ्या 'कुर्या चालल्या रानात' या गीतावर इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी शेतकरी नृत्य सादर केले. मातृभूमीत जन्मलेल्या नररत्नांचे स्मरण करून देणारे 'ही मायभूमी ही जन्मभूमी' हे गीत इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. स्नेहसंमेलनाचा परमोच्च क्षण म्हणजे शिवराज्याभिषेक सोहळा. इयत्ता सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून महाराजांना मानवंदना अर्पित करून स्नेहसंमेलनाची सांगता केली.

विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. अशोकराव जोशी, संस्थेतील इतर मान्यवर व पालक मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

शाळा संचालिका शरयू यशवंतराव यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका प्रज्ञा पारकर, जान्हवी चाळके, कल्पेश जुवेकर, पल्लवी तेंडुलकर, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले.







*भारतीय संस्कृती आणि एकात्मतेचे दर्शन घडविणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम*






# एसव्हीजेसीटी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये ‘फॉरेन लँग्वेज डे’साजरा




*विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना प्रखर करताना वीरमाता अनुराधाताई गोरे, सोबत व्यासपीठावर डॉ. कृपा कुलकर्णी(उजवीकडून दुसऱ्या) आणि अध्यापक वर्ग*




*विद्यार्थ्यांचा गौरव करताना वीरमाता अनुराधाताई गोरे*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये ‘परदेशी भाषा दिन’ मोठ्या उत्साहात पार पडला. शाळेमध्ये जर्मन आणि स्पॅनिश भाषा शिकवल्या जातात. इयत्ता पाचवीपासून विद्यार्थी या परदेशी भाषा शिकण्याचा लाभ घेतात. या परदेशी भाषांच्या वेगवेगळ्या पात्रता परीक्षा आणि त्यांच्यासाठी आवश्यक असणारा अभ्यासक्रम शाळेमध्ये शिकवला जातो. वर्षअखेरीस या भाषांमधून विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. यावर्षी ‘समईच्या शुभ्र कळ्या’ ही संकल्पना घेऊन ‘फॉरेन लँग्वेज डे’ साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून, आपल्या मुलासारखे शेकडो सैनिक देशासाठी तयार करण्यासाठी ज्या मोलाची कामगिरी करत आहेत अशा शहीद कॅप्टन विनायक गोरे यांच्या मातोश्री, ‘पार्ले टिळक विद्यालया’च्या माजी शिक्षिका आणि ‘राजा रामदेव पोतदार हायस्कूल, सांताक्रूज’च्या माजी मुख्याध्यापिका श्रीमती अनुराधाताई गोरे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने आणि ईशस्तवनाने झाली. शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून देताना शहीद विनायक गोरे यांची चित्रफीत दाखविली आणि ‘वारस होऊ अभिमन्यूचे’ या प्रेरणादायी पुस्तकाच्या लेखिका अनुराधाताई यांच्या आजवरच्या कार्याचा जीवनपट उलगडून सांगितला.

‘समईच्या शुभ्र कळ्या’ या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना जर्मन आणि स्पॅनिश भाषेच्या शिक्षिका डॉ. कृपा कुलकर्णी म्हणाल्या की, समयीमध्ये प्रज्वलित असलेल्या प्रत्येक ज्योतीमागे एक वात स्वतः जळत असते. अशा अनेक वाती जळतात म्हणून अनेक ज्योतींनी पेटलेली समई आपल्याला दिसते. तसेच अनेक वीरमाता घराघरांतून राबत असतात म्हणूनच देशासाठी सर्वोच्च बलिदान करणारे देशाभिमानी सैनिक सीमेवर शत्रूच्या गोळ्या छातीवर झेलत मातृभूमीचे संरक्षण करत असतात. भारताच्या इतिहासात जे थोर पुरुष झाले त्या प्रत्येकाच्या मागे त्यांच्या कुटुंबातील स्त्रियांच्या त्यागाचा आणि खंबीर पाठिंब्याचा मोलाचा वाटा होता. अशा अनेक ज्ञात-अज्ञात महिलांच्या योगदानावर ’समईच्या शुभ्र कळ्या’ हे पुस्तक वसुंधराताई परांजपे यांनी लिहून आपल्या संस्थेला भेट दिले आहे. त्या पुस्तकातील व्यक्तिरेखांवर आधारित छोट्या छोट्या नाट्यांच्या माध्यमातून जर्मन आणि स्पॅनिश भाषेतील हा कार्यक्रम आधारलेला आहे. अशा या वीरमातांना आणि घराघरातून राबणाऱ्या एकूणच प्रत्येक महिलेला हा कार्यक्रम एक मानवंदना ठरावी.

या वेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते जर्मन आणि स्पॅनिश भाषेमध्ये प्रावीण्य मिळवलेल्या विविध विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला.

आपल्या मनोगतामध्ये श्रीमती अनुराधाताई गोरे म्हणाल्या की, एवढ्या सुंदर संस्थेच्या विलोभनीय प्रांगणामध्ये तुम्ही शिकता आहात, तेव्हा डोळे आणि कान उघडे ठेवा. त्याचबरोबर मन आणि बुद्धीची सांगड घालून जर ज्ञान मिळवले तर तुम्ही उत्तम यश संपादन करू शकाल. इथे तुम्ही मराठी, हिंदी, संस्कृत व इंग्लिश सोबतच स्पॅनिश आणि जर्मन या विदेशी भाषा शिकत आहात हे फारच कौतुकास्पद आहे.

या वेळी त्यांनी जगातील एका अतुलनीय युद्धाची,




*क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षावर आधारित नाटिका*



Wheels on the bus... *या गाण्यावर नृत्य करताना*

केवळ १३ दिवसांमध्ये भारताने देदीप्यमान पराक्रम करीत जिंकलेल्या १९७१च्या भारत-पाक युद्धाची माहिती दिली. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या युद्धकलांचे, इतिहासातील रणरागिणी स्त्रियांचे, भारतीय सैन्यातील भूदल, नौदल आणि वायुदलातील अनेक वीर जवानांच्या कर्तबगारीचे दाखले देत त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांच्या मनामध्ये देशभक्तीची भावना आणि चैतन्य जागृत केले.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी जर्मन आणि स्पॅनिश भाषेतील विविध कार्यक्रमांचे सादरीकरण केले. सुरुवातीलाच अनुष्का सकपाळ आणि ईशा रानडे या विद्यार्थिनींनी कथ्थक नृत्य उत्कृष्ट पद्धतीने सादर केले. त्यानंतर स्त्रीशिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षावर आधारित नाटिका सादर झाली. भारताच्या राष्ट्रपती मा. द्रौपदी मुर्मूजींची निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी ध्वनिचित्रफीत दाखवण्यात आली. स्वातंत्र्यवीर सावरकर यांना त्यांच्या बंधूंसह जन्मठेप झाल्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या वहिनी सौ. शांतावहिनी सावरकर यांनी अत्यंत संयमाने सामना केलेल्या एका धिरोदात्त प्रसंगाचे सादरीकरण झाले. स्पॅनिश बॅच-२च्या विद्यार्थ्यांनी एक स्पॅनिश गाणे सादर केले. संयुक्त राष्ट्रसंघाने जाहीर केलेले आंतरराष्ट्रीय महिलागीत विद्यार्थ्यांनी गाऊन सादर केले. याच गीताचे हिंदी भाषेतील सादरीकरण अवनीश जाधव या विद्यार्थ्याने केले. राणी गीता, राणी अब्बाक्कादेवी, राणी चेन्नम्मा, राणी नायकादेवी, राणी कर्णावती, कॅप्टन लक्ष्मी सहगल अशा अनेक मध्ययुगीन आणि ऐतिहासिक काळातील विविध वीरांगनांची माहिती विद्यार्थ्यांनी उपस्थितांना व्हिडिओ सादरीकरणाच्या माध्यमातून करून दिली. स्पॅनिश भाषेतील व्याकरणाचे गीतातील रूपांतर उपस्थित विद्यार्थ्यांना आनंद देऊन गेले. 'वी आर वन' या स्पॅनिश गाण्यावर विद्यार्थ्यांनी विविधतेतून एकतेचे दर्शन घडविले. आणि सर्वात आकर्षण ठरले ते छत्रपती शिवाजीमहाराज आणि अफजलखान यांच्या भेटीचा प्रसंग. इतिहासातील अफजलखानाचा वध या प्रसंगाचे जर्मन भाषेतील सादरीकरण उपस्थितांची दाद घेऊन गेले. या रंगारंग सादरीकरणांचा शेवट 'हम होंगे कामयाब' या गाण्याच्या जर्मन आणि स्पॅनिश अनुवादाने झाला. कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम' ने झाली.

विद्यार्थ्यांच्या या विविध गुणदर्शनाच्या सादरीकरणाचे सूत्रसंचालन ग्रीष्मा नांदोस्कर, राधा पाटणकर आणि अनुष्का सकपाळ या विद्यार्थ्यांनी केले. बक्षीस वितरण समारंभाचे सूत्रसंचालन गीता सकपाळ तर मुख्य कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रिया महाडिक आणि प्राची गोखले या शिक्षिकांनी केले. शिक्षक ओंकार तांबे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमाला आदरणीय श्री. अशोकराव जोशी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी उपस्थित होते. त्याचबरोबर संस्थेचे पदाधिकारी, संचालिका शरयू यशवंतराव, सर्व विभागांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या उत्साहाने हजर होते.



'वी आर वन' या स्पॅनिश गाण्यावर सादरीकरण करताना

# वालावलकर रुग्णालय आणि नर्सिंग कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन साजरे



*डॉ. निशिगंधा वाड यांचा सत्कार करताना डॉ. सुवर्णा पाटील (वैद्यकीय संचालिका)*



*डॉ. निशिगंधा वाड दीप प्रज्वलन करताना*

डेरवण येथील समर्थ नर्सिंग कॉलेज व भ. क. ल. वालावलकर रुग्णालय डेरवण येथील वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण सभारंभ दि. १५ जानेवारी २०२४ रोजी उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी सुप्रसिद्ध अभिनेत्री मा. डॉ. निशिगंधा वाड उपस्थित होत्या.

श्रीक्षेत्र डेरवण येथील वातावरण बघून हे निसर्गाच्या कुशीतील एक पारदर्शी राऊळच आहे आणि हे बघून आमची मनोवस्था अतीव प्रसन्न झाली आहे असे उद्‍गार डॉ. निशिगंधा वाड यांनी काढले. विद्यार्थ्यांच्या कलांमधून त्यांची देशभक्ती पाहून त्यांचे मन भारावून गेले. डॉ. सुवर्णा पाटील यांनी त्यांना संस्थेची माहिती सांगितली, त्यावर आपल्या भाषणात संस्थेचे कौतुक करताना त्या म्हणाल्या, ‘आज मी सगळ्याचं कौतुक करताना एवढी गुलाबाची फुले दिली, पण एकाही गुलाबाला काटा नव्हता. अहो, सगळ्यांच्या आयुष्यातले विवंचना आणि कष्ट यांचे काटे वेचताना इथवर उभी राहिलेली ही तपश्चर्या आणि हे तपश्चर्या केंद्र याला कितीही वेळा वाकून नमस्कार केला तरी कमीच आहे.’

विद्यार्थ्यांशी गप्पा मारताना त्या म्हणाल्या, ‘इवलसं रोप जरी कुंडीत लावलं व ते लोखंडी गजाजवळ ठेवलं तरीसुद्धा ते सोनेरी सूर्यप्रकाशाकडे धाव घेतं. तर मग आपण स्वतः ही संधी का नाकारायची? आपल्यांला असे गुरू या संकुलात लाभले आहेत. त्याच संस्कारांचे आणि संस्कृतीचे बोट धरून मोठे व्हा, असे आव्हान त्यांनी विद्यार्थांना केले आहे. ह्या कार्यक्रमात संस्थेचे हितचिंतक आणि रुग्णांना योग्य मार्गदर्शन करून वालावलकर रुग्णालयात उपचारासाठी मार्ग दाखवणाऱ्या अनेक समाजसेवकांचा सत्कार डॉ. निशिगंध वाड यांच्या हस्ते करून त्यांचे कौतुक करण्यात आले. यात महाड (जि. रायगड) येथील अनेक सामाजिक संस्थांच्या समाज सेवकांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या शेवटी कलागुणांचे कौतुक करून कार्यक्रमाची रुचकर स्नेहभोजनाने सुखद सांगता झाली.



*सांस्कृतिक कार्यक्रमानंतर विद्यार्थी परिचारिकांचे कौतुक करताना निशिगंधा वाड, त्यांचे पती श्री. दीपक देऊळकर आणि कन्या ईश्वरी*



*सेंट्रल क्लिनिकल लॅबोरेटरीतील तंत्रज्ञांनी साकारलेले अयोध्येतील श्रीराम मंदिर आणि श्रीराम दरबार*

# करंगळीच्या हाडावरील बोनट्युमरवर शस्त्रक्रिया



*डॉ. नंदन कानविंदे आणि डॉ. सुनील नाडकर्णी रुग्ण आणि परिचारिकांसमवेत*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात सतरा वर्षांच्या मुलीच्या उजव्या हाताच्या करंगळीच्या जवळील हाडातील गाठीवर डॉ. नंदन कानविंदे(UK Wales) आणि डॉ. सुनील नाडकर्णी यांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली.

या मुलीला गेल्या दीड वर्षापासून उजव्या हातांच्या करंगळीखालील हाडांमध्ये वेदना होत होत्या. त्या ठिकाणी सूजही आली होती. सहा महिन्यांपूर्वी तिच्यावर बाहेरील रुग्णालयात शस्त्रक्रिया केली होती. परंतु ती गाठ पूर्णपणे काढली नव्हती, त्यामुळे त्याच ठिकाणी परत गाठ तयार झाली होती. त्या मुलीला सतत वेदना होत होत्या. ही तरुणी वालावलकर रुग्णालयात आल्यानंतर तिच्या हाताचा एक्स-रे करण्यात आला. त्यामध्ये करंगळीच्या खालील हाडांमध्ये गाठ असल्याचे आढळून आले. त्यानंतर तिच्या हाताचा एम.आर.आय. व सिटी स्कॅन करण्यात आले. त्याद्वारे गाठ शेजारील स्नायूंमध्ये, सांध्यात व शेजारील हाडांमध्ये पसरलेली आहे की नाही हे पाहण्यात आले. तिची डॉ. नंदन कानविंदे, डॉ. सुनील नाडकर्णी यांनी तपासणी केली व शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. त्या तरुणीवर वालावलकर रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली. या शस्त्रक्रियेत ती गाठ पूर्णता काढून टाकण्यात आली असून तिच्या उजव्या पायाच्या चंप्यामधील चार नंबरच्या बोटाच्या पाठीमागील हाड काढून बसविण्यात आले. ही शस्त्रक्रिया अतिशय क्लिष्ट स्वरूपाची होती. या प्रकारची अतिउच्च दर्जाची शस्त्रक्रिया केल्यामुळे रुग्णाला तिची करंगळी पूर्वीसारखीच व्यवस्थित वापरता येणार आहे. रुग्णांचा उपचारांचा खर्च हा पूर्णपणे ‘महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजने’तून वालावलकर रुग्णालयात मोफत करण्यात आला.

# डॉ. सुनीता चांदोरकर आणि डॉ. अंजली गणपुले यांची डेरवण कोहार्टला भेट



*डावीकडून -*
*डॉ. अंजली गणपुले,*
*डॉ. सुवर्णा पाटील*
*डॉ. सुनीता चांदोरकर*
*मिस. हिमांशी पांडे,*
*श्री. चारुदत्त जोगेळेकर*

बडोदा येथील एम एस युनिव्हर्सिटीमधील आहारतज्ज्ञ प्राध्यापिका डॉक्टर सुनीता चांदोरकर आणि सी.सी.डी.सी. दिल्ली येथील नूट्रिशनिस्ट डॉक्टर अंजली गणपुले यांनी डेरवण कोहार्ट प्रकल्पाला दि. २५ डिसेंबर २०२३ रोजी भेट दिली.

डेरवण कोहार्ट हा कोकणातील १५०० किशोरवयीन मुलींचा एक गट अभ्यासासाठी आणि कुपोषण आणि त्याचे होणारे परिणाम अभ्यासण्यासाठी तयार केला आहे. ह्या मुलींना आहाराबद्दल योग्य मार्गदर्शन, उपलब्ध अन्नधान्ये, फळे, डाळी ह्यामधून पोषण आहार कसा तयार करायचा याचे मार्गदर्शन करून त्यांच्यातील जीवनसत्त्वांची कमतरता कशी दूर करता येईल ह्यावर प्रकाश टाकला गेला.

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# डॉ. शिवराम मूर्ती यांची भ. क. ल. वालावलकर रुग्णालयाला भेट



कुडप धनगरवाडीत जाऊन वस्तुस्थिती जाणून घेताना डॉक्टर शिवराम मूर्ती आणि चमू

अमेरिकास्थित डॉ. शिवराम मूर्ती यांनी दि. ९ आणि १० जानेवारी २०२४ला भ. क. ल. वालावलकर रुग्णालयाला भेट दिली डॉ. शिवराम मूर्ती 'टॉडलर फूड पार्टनर्स'(TFP)चे डायरेक्टर आहेत. ह्या संस्थेचा मूळ उद्देश अन्नाच्या उत्पादनप्रक्रियेवर लक्ष केंद्रित करून 'रेडी टू यूज' अन्न तयार करण्याकरिता मार्गदर्शन करणे आणि विकसनशील देशांमधील मुलांमधील गंभीर कुपोषण रोखणे हा आहे .

डॉ. मूर्ती 'जनरल मिल्स RD'मधून फेलो म्हणून सेवानिवृत्त झाले असून त्यांना प्रक्रिया आणि उत्पादन विकास आणि RD व्यवस्थापनाचा ३१ वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बॉम्बे येथून रसायन अभियांत्रिकीची पदवी आणि मिनेसोटा विद्यापीठातून केमिकल इंजिनीअरिंगमध्ये पीएच.डी. प्राप्त केली आहे.

CTI आणि TFP प्रकल्पांना मदत करण्यासाठी त्यांनी भारत आणि बांगलादेशमध्ये अनेक दौरे केले आहेत. ग्रामीण आणि शहरी उद्योजकांना अन्न प्रक्रियेच्या क्षेत्रात योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून शाश्वत उत्पन्न देणारे उपक्रम तयार करण्यात मदत करून कुपोषणाच्या समस्यांचे निराकरण करणे हे त्यांच्या संस्थेचे उद्दिष्ट्य आहे आणि म्हणूनच वालावलकर रुग्णालयात भेट देताच त्यांनी कुडप धनगरवाडी या गावाला भेट देऊन आरोग्य आणि पौष्टिकतेचा शोध घेण्यासाठी राहिवासी लोकांशी संपर्क साधला.

या अभ्यासाच्या दृष्टिकोन कमी वजनाची (LBW) नवजात बालके, कुपोषित गर्भवती माता यांच्यासाठी काम करणे हा आहे असे मत व्यक्त करून डेरवण कोहार्टच्या माध्यमातून हा उद्देश सफल होऊ शकतो आणि 'Toddler Food' या उपक्रमासाठी नक्कीच मदत करेल असे प्रतिपादन केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवरबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,